| MHKO160003072019 | नियमित दिवाणी दावा ४४/२०१९ मधील<br>नि.क्र. ४२ खालील आदेश |
|---|---|

१. प्रतिवादी क्र ८ यांनी प्रस्तुतचा अर्ज आणि सोबतचे प्रतिज्ञापत्र दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश २६ नियम ९ अन्वये कोर्ट कमिशनर यांची नेमणूक होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. सदर प्रतिवादी क्र ८ यांनी कथन केले की वादी यांनी प्रस्तुतचा प्रतिवादींविरूध्द मौजे येळाणे, ता. शाहुवाडी येथील गट क्र ४३/४/५/६/५ पैकी क्षेत्राबाबत हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यात प्रतिवादी क्र ८ यांनी आपली कैफियत व म्हणणे दाखल केले. वरील जमिनीमध्ये प्रतिवादी क्र ७ चे मालकी वहिवाटीचे ०.१ आर एवढे क्षेत्र होते. सदर क्षेत्राची दक्षिणेकडील पूर्व पश्चिम लांबी ५८ फूट, उत्तरेकडील पूर्व पश्चिम लांबी ५८ फूट तसेच पूर्वेकडील दक्षिणोत्तर रूंदी १७.६ फूट व पश्चिमेकडील दक्षिणोत्तर रूंदी १८.९ फूट या पडसर जागेचा ग्रामपंचायत येळाणे यांचेकडील मिळकत क्र. ७८५ असा होता. सदर मिळकतीच्या चतुःसिमा खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | - | पांडूरंग श्रीपती पाटील यांची ७ फूट लांब व ५ फूट रूंदीची पाण्याची टाकी व गणेशनगर मेन रोड |
| पश्चिमेस | - | कोल्हापुर रत्नागिरी रस्ता |
| दक्षिणेस | - | सदर गटातील पांडूरंग श्रीपती पाटील यांची जमीन व घर मिळकत |
| उत्तरेस | - | याच गटातील शालन नामदेव यांची जमीन. |

२. सदरची मिळकत ही प्रतिवादी क्र ८ ने प्रतिवादी क्र ७ कडून खरेदी घेतलेली आहे. तेव्हापासून प्रतिवादी क्र. ८ ची सदर मिळकतीमध्ये कब्जेवहिवाट आहे. सदर मिळकतीचा पूर्वेस व उत्तरेस प्रतिवादी क्र ८ ने जांभा दगडातील भिंत घातली असून सदर मिळकतीत प्रतिवादी क्र ८ ने फॅब्रिकेशन मधील पत्र्याची एक खोली बांधली असून सदर खोलीमध्ये प्रतिवादी क्र ८ हे पश्चिमेकडील कोल्हापुर रत्नागिरी रस्त्यातून

ये जा करीत आहेत. सदर पत्र्याचे खोली व कंपाउंड भिंत याबाबत जागेवरील प्रत्यक्ष वस्तुस्थिती कोर्टाचे निदर्शनास येणे आवश्यक आहे. म्हणून प्रतिवादी क्र. ८ यांनी सदरचा कामी कोर्ट कमिशनर मार्फत मोजणी होवुन सदर परिस्थितीचा अहवाल कामात येणेकामी अर्ज दिला असून तो मंजूर व्हावा अशी विनंती केली आहे.

३. वादी यांनी कथन केले की सदरचा दावा त्यांनी हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केला आहे. सदरचा दावा वादीने वाटणीसाठी अथवा हद्दीसाठी दाखल केलेला नाही. सदर दावा दाखल केला त्यावेळी प्रतिवादी क्र. ८ हे या दाव्यामध्ये पक्षकार नव्हते. प्रतिवादी क्र ७ यांनी या दाव्यात कैफियत दाखल केली आहे. प्रतिवादी क्र. ७ यांचेकडून दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र ८ यांनी बेकायदेशीर व जाणूनबुजून खरेदीपत्र नोंदविले आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ८ यांना या कामी दावा दुरूस्त करून प्रतिवादी म्हणून सामील केलेले आहे. असे असल्यामुळे प्रतिवादी क्र. ८ यांना मुळातच या कामी मोजणी सारखी कोणतीही दाद मागणी करण्याचा अधिकार नाही, तो बेकायदेशीर खरेदीदार आहे. त्यामुळे मुळातच दावा दाखल केल्यानंतर वादींनी दावा मिळकतीत आपले शेड उभे केले आहे, ते शेड आपले आहे हे दाखविण्याचा व त्यानुसार पुरावा नि.५ चे चौकशीकामी आणण्याचा प्रयत्न प्रतिवादी क्र. ८ करीत आहेत. प्रतिवादी क्र ८ यांनी पुरावा गोळा करण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सदरचा दावा निर्गत करण्यासाठी मोजणीची कोणतीही आवश्यकता नाही. तसेच प्रतिवादी क्र. ८ यांचा दावा मिळकतीतील बांधकाम व शेड यांच्याशी कोणताही संबंध नाही. नि.५ कडील चौकशी लांबणीवर टाकण्यासाठी सदरचा खोटा अर्ज चार वर्षाच्या विलंबाने दाखल केलेला आहे व तो नामंजूर व्हावा अशी विनंती वादींनी केली आहे.

४. दोन्ही बाजूंचे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अभिलेखावरील कागदपत्रे यांचे अवलोकन केले आहे. प्रतिवादी क्र ८ यांनी या दाव्यात कैफियत व म्हणणे दाखल केलेले आहे. तसेच त्यांनी सदर दाव्यामध्ये काउंटर क्लेम- प्रतिदावा दाखल केलेला नाही. तसेच प्रतिवादी क्र ८ यांची या दाव्यामध्ये कोणतीही मागणी नाही. वादीने सदरचा दावा हा प्रतिवादीविरूध्द हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. सदरचा दावा वादीने वाटणीसाठी अथवा हद्दीसाठी दाखल केलेला नाही. प्रतिवादी क्र ८ यांनी खरेदी केलेली मिळकत व दावा मिळकतीचे दाखल केलेले कागदपत्रांवरून कोणताही संबंध दिसत नाही. प्रतिवादी क्र.८ यांनी दाखल केलेले

अर्जामध्ये ज्या जागेचे ते कोर्ट कमिशनर मार्फत मोजणी करून मागतात ती जागा दावा मिळकत नाही. दावा मिळकतीत व प्रतिवादी क्र. ८ यांनी सदर अर्जात नमूद केलेली मिळकत ही वेगवेगळी असल्याचे दिसते. तसेच दावा मिळकत व प्रतिवादी क्र. ८ यांनी खरेदी केलेली मिळकत या प्राथमिकरित्या भिन्न दिसतात. प्रतिवादी क्र. ८ यांनी या दाव्याचे कामी कोणतीही दाद मागितलेली नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.८ यांनी सदर अर्जामध्ये नमूद केलेली कारणे कोर्ट कमिशनर मार्फत मोजणी करण्यासाठी आवश्यक नाही. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार नाही. सबब, वर नमूद निष्कर्शास अनुसरून मी खालील आदेश करीत आहे.

आदेश

अर्ज ४२ नामंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by Amol Shriram Shinde
Date: 2023.06.28 11:05:43 +0530

दिनांक – २२/०६/२०२३

स्थळ- शाहूवाडी

( अमोल श्रीराम शिंदे )
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
मलकापूर- शाहूवाडी, जि. कोल्हापुर